ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख १९ जुलै, १९६१ | अंक १४


## विविध माहिती

**मच्छीमारीसाठी यंत्रचलित बोटी**— मच्छीमारीवर उपजीविका करणाऱ्या कोळ्यांना यंत्रचलित बोटी देण्याचें म्हैसूर सरकारनें ठरविलें आहे. त्यासाठी कारवार येथें अशा बोटी बांधण्याचा कारखाना स्थापन करण्यांत आला आहे. आतांपर्यंत आठ बोटी कोळ्यांना पुरविण्यांत आल्या आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत अशा २५० बोटी पुरविण्याचा सरकारचा विचार आहे. मंगलोर येथेंहि बोटी बांधण्याचा कारखाना उघडण्यांत आला आहे.

**सहकारी औद्योगिक वसाहत** - बलसाडजवळ लवकरच एक सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यांत येणार आहे. वसाहतीसाठी बलसाड उद्योगनगर को-ऑपरेटिव्ह असोसिएशननें ८४ एकर जागा खरेदी केली आहे. जागेसाठी ५४,००० रुपये किंमत द्यावी लागली. वसाहतीला उपयुक्त अशी रेल्वे व बंदर-वहातुकीची सोय आहे. असोसिएशनचें भांडवल ५ लाख रुपये आहे.

**नमुनेदार शेतीसाठी मदत**—शेतीच्या आधुनिक पद्धती शेतकऱ्यांना समजावून देण्याची एक योजना मध्यप्रदेश सरकारनें आंखली आहे. ह्या योजनेप्रमाणें १५ शेतकी पदवीधरांना प्रत्येकी ३० एकर जमीन देण्यांत येईल. पदवीधरांनीं शेतीच्या आधुनिक पद्धतींचा उपयोग करून नमुनेदार शेती कशी असते तें दाखवून द्यावयाचें आहे. ह्या योजनेवर तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १ लाख रुपये खर्च करण्यांत येतील.

**मृत राजाचा शाप?**—लॉर्ड वेस्टबरी जिनीव्हा येथें अचानकपणें निधन पावले. त्यांचे वडील कॅ. रिचर्ड बेथेल ह्यांनीं इजिप्तमधील प्राचीन राजा तुतानखामेन ह्याचें पिरॅमिडमधील थडगें संशोधनासाठी उकरलें होतें. ते आपल्या वयाच्या ४६ वर्षीं असेच अचानक निधन पावले होते. लॉर्ड वेस्टबरी ह्यांचेंहि वय ४६ च होतें. १९३० सालीं लॉर्ड वेस्टबरी ह्यांच्या आजानें आत्महत्या केली. १९५६ सालीं कॅप्टन बेथेल ह्यांच्या विधवेनेंहि आत्महत्या केली. ह्या कुटुंबाला शापाची बाधा आहे असें म्हणतात.

**शिवणाच्या यंत्राचा कारखाना**—कलकत्याच्या जय एंजिनिअरिंग वर्क्स ह्या कंपनीला हैद्राबाद येथें कारखाना काढण्याचा परवाना मिळाला आहे. ह्या कारखान्यांत प्रथम शिवणाचीं यंत्रें तयार करण्यांत येणार आहेत. नंतर शीतपेट्यांना लागणारा एक महत्वाचा भाग कारखान्यांत तयार होऊं लागेल. शिवणाच्या यंत्रासाठी लागणारी यंत्रसामग्री कंपनीच्या हातीं आली असून ६ महिन्यांच्या अवधींत उत्पादनास प्रारंभ होईल. आंध्र सरकार कारखान्यासाठी जागा मिळवून देत आहे.

**म्हैसूरचा लोखंडाचा कारखाना**—म्हैसूर आयर्न अँड स्टील वर्क्स हा कारखाना म्हैसूरचें सरकार आपलें एक खातें म्हणून चालवीत होते. आतां हा कारखाना चालविण्यासाठी म्हैसूर आयर्न अँड स्टील कंपनी स्थापन करण्यांत आली आहे. नव्या कंपनीचें भांडवल २० कोटी रुपये असेल. नव्या कंपनीमुळें कारखान्याचा विस्तार करण्याचें काम सुलभ होणार आहे.

**रशिआ व चीनमध्यें वितुष्ट**—अणुशक्तीच्या विकासासाठी रशिआ चीनला मदत करीत होता. पण अलीकडे ह्या दोन राष्ट्रांत वितुष्ट आल्याची बातमी आहे. रशियानें पाठविलेल्या अणुभट्टी-पासून अणुबाँबला लागणारें स्फोटक मिळूं शकलें नाहीं. त्यामुळें चीनचें सरकार असंतुष्ट झालें आहे. रशिआनें मदत न केली तरी चीन १९६२ मध्यें स्वतःचा अणुबाँब करील, असा अंदाज करण्यांत येत आहे.

**इटलीच्या सरकारी कंपनीशीं करार**—भारतामधील खनिज तेलाचा शोध आणि सार्वजनिक मालकीच्या कारखान्याकडून होणारें तेलाचें शुद्धीकरण, ह्याविषयीं भारत सरकार आणि इटालिअन सरकारच्या मालकीची कंपनी ह्यांच्यांत करार झाला आहे. इटालिअन कंपनीनें भारताला ४२ कोटी रुपयांचें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. गुजरात राज्याच्या कच्छ भागांत तेलाचा शोध करण्याचें काम कंपनीकडे सोंपविण्यांत येणार आहे.

**विदर्भामधील सायकलींचा कारखाना**—महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री श्री. एस्. के. वानखेडे ह्यांनीं अमरावती येथें काढण्यांत आलेल्या सायकलींच्या कारखान्याचें उद्घाटन केलें. ह्या कारखान्यांत दरसाल २५,००० सायकली तयार होतील इतकी यंत्रसामग्री बसविण्यांत आली आहे मात्र चालू वर्षी फक्त १२,००० सायकलींचेंच उत्पादन करण्यांत येणार आहे.

**जर्मन तज्ज्ञाची नेमणूक**—रूरकेला येथें जर्मनीच्या साह्यानें उभारण्यांत आलेल्या पोलादाच्या कारखान्यांतील एका भागांत बिघाड झाल्यानें कारखाना कांहीं दिवस बंद ठेवावा लागला होता. कारखान्यांतील झोतभट्ट्यांवर देखरेख करण्यासाठी आतां एका जर्मन तज्ज्ञाची नेमणूक करण्यांत आली आहे. ह्या तज्ज्ञाचा पगार पश्चिम जर्मनीचें सरकार देणार आहे.

**हरिजनांचा मंदिर-प्रवेश**—अंबाला जिल्ह्यांतील एका खेडे गांवच्या लोकांनीं ४०० हरिजनांना मुद्दाम बोलावून मंदिर-प्रवेशाची परवानगी दिली. नंतर हरिजनांना प्रसादहि देण्यांत आला. ह्या खेड्यांतील पंचायतींत असलेल्या हरिजन पंचाला पूर्वी इतर पंचाइतका मान मिळत नसे. तेढ आतां संपली आहे. भारत सेवक समाजातर्फे ही दिलजमाई घडवून आणण्यांत आली.




**बेडेकर**

**मसाले, लोणचीं व पापड**

आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.

वापरून पाहा.

मुगभाट, मुंबई ४.

शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

**५०** वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ **सरदारगृह** ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.


क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

## पुढील आयुष्यांत त्याला शिक्षणाचाच आधार...

*आज तुम्ही त्याला आधार देऊन उभा करीत आहांत पण पुढील आयुष्यांत त्याचा खरा आधार म्हणजे उच्च शिक्षणच! त्याची सोय आजच विमा उतरवून तुम्हांला करतां येईल. दुर्दैवानें तुम्ही हयात नसला तरीहि ठरलेली रक्कम त्याला मिळेलच आणि त्याचे शिक्षणहि पूर्ण होईल.*

*उदाः तुमचे वय ३० आहे आणि तुमच्या मुलांचें २ वर्षांचें आहे, तर दरमहा सुमारें रु. १० हप्ता भरून त्याच्या वयाच्या १६ व्या वर्षापासून २० व्या वर्षापर्यंत दर सहामाहीस त्याला रु. २०० प्रमाणें ५ वर्षें पर्यंत पैसे मिळतील. दुर्दैवानें अकाली मृत्यू ओढवल्यास हप्ते थांबतात पण मुलाला मात्र ठरलेली रक्कम हमखास मिळतेच. अधिक माहितीसाठीं विमा एजंटाला भेटा.*

आयुर्विम्याला पर्याय नाहीं



# अर्थ

बुधवार, ता. १९ जुलै, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अमेरिकेनें पाकिस्तानला दिलेली मदत

पाकिस्तानांतील कांहीं वृत्तपत्रांनीं गेल्या कांहीं महिन्यांत असा प्रचार चालविला आहे कीं, पाकिस्तान हा देश अमेरिकेचा विश्वासू मित्र असतांनासुद्धां आंतरराष्ट्रीय राजकारणांत तटस्थ भूमिका घेणाऱ्या भारताला अमेरिकेनें अधिक आर्थिक मदत केलेली आहे. ह्या प्रचाराला उत्तर देण्यासाठींच कीं काय कराचींतील अमेरिकेच्या वकिलातीनें एक पत्रक काढलें आहे. ह्या पत्रकांत अमेरिकेनें पाकिस्तानला दिलेल्या आर्थिक साह्याची तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे. त्यावरून असें दिसतें कीं गेल्या दहा वर्षांत अमेरिकेनें पाकिस्तानला दरडोई सरासरी १५ डॉलर्स दिलेले आहेत. उलटपक्षी, भारताला दरडोई ६·२० डॉलर्सच ह्या कालांत मदत म्हणून देण्यांत आलेले आहेत. ३० जून, १९६१ ला संपलेल्या दहा वर्षांच्या कालांत अमेरिकेनें पाकिस्तानला आर्थिक साह्य व तांत्रिक मदत मिळून सुमारें १५० कोटी डॉलर्स कर्जे अगर देणग्या ह्यांच्या स्वरूपांत दिलेले आहेत. ह्याशिवाय लष्करी स्वरूपाची दिलेली मदत वेगळीच आहे. १९५१ सालापासून अमेरिकेनें पाकिस्तानच्या १०० वर विकासयोजनांना साह्य दिलेलें आहे. पाकिस्तानची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण व विकासक्षम व्हावी म्हणूनच वरील योजना आंखण्यांत आलेल्या होत्या. सार्वजनिक उपयुक्ततेचें धर्मादाय कार्य करणाऱ्या अमेरिकन संघटनांनींहि पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर मदत केलेली आहे. अमेरिकेनें अलीकडे 'शांततेसाठीं अन्न' वाटण्याची एक योजना आंखली आहे. ह्या योजनेप्रमाणें पाकिस्तानच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत अमेरिका पाकिस्तानला अन्नधान्य व शेतीचा माल ह्यांचा पुरवठा करणार आहे. ही मदत चार वर्षेपर्यंत देण्यांत येणार असून १९६५ अखेर तिचा आंकडा ७५ कोटी डॉलर्सपर्यंत पोंचेल.

---

## ओरिसा राज्यांत सरकारी मालकीच्या अधिक कंपन्या

भारताच्या औद्योगीकरणांत सार्वजनिक मालकीच्या कंपन्यांप्रमाणें खाजगी मालकीच्या कंपन्यांनाहि वाव ठेवण्यांत आलेला आहे. संमिश्र स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेंत हें अपरिहार्य म्हणतां येईल. पण ज्या वेळीं खाजगी भांडवल पुढें येत नाहीं त्या वेळीं सरकारला औद्योगीकरणांत भाग घ्यावा लागतो. ओरिसा सरकारच्या उदाहरणावरून ही गोष्ट पटण्यासारखी आहे. सरकारतर्फे प्रसिद्ध करण्यांत आलेल्या माहितीप्रमाणें गेल्या वर्षी एकूण १३९ सरकारी अगर सार्वजनिक मालकीच्या कंपन्या स्थापन करण्यांत आल्या. त्यांपैकीं ४४ कंपन्या ओरिसांत काढण्यांत आल्या. त्यांतहि एक बाब विशेष लक्षांत येण्यासारखी आहे. सामान्यपणें ज्या क्षेत्रांत भांडवल गुंतविण्यास खाजगी भांडवल पुढें होतें त्या क्षेत्रांतहि ओरिसा सरकारला कांहीं कंपन्या काढाव्या लागल्या आहेत. उदाहरणार्थ अन्नपदार्थांवर संस्करण करणारे कारखाने, रासायनिक कारखाने, इत्यादि. ओरिसा राज्याचें औद्योगीकरण घडवून आणण्याच्या कामीं एकंदरीनें खाजगी भांडवलानें जेव्हां पुढाकार घ्यावयास पाहिजे होता तितका तो घेतलेला दिसत नाहीं. त्यामुळें भारत सरकारच्या औद्योगिक धोरणाविषयींच्या ठरावास अनुसरून ओरिसा सरकारला पुढाकार घ्यावा लागला. ओरिसांत स्थापन झालेल्या कंपन्यांचें पृथःकरण करतां असें दिसतें कीं, राज्यसरकारनें स्थापन केलेल्या कंपन्यांपैकीं १५ कंपन्यांचें अधिकृत भांडवल १ लाखापेक्षा कमी होतें. १७ कंपन्यांचें अधिकृत भांडवल १ लाखापेक्षा अधिक पण ५ लाखांपेक्षा कमी होतें. ११ कंपन्यांचें अधिकृत भांडवल ५ लाखांपेक्षा अधिक पण २५ लाखांपेक्षा कमी होतें. ओरिसा राज्यांत फक्त एकच कंपनी ५० लाख रुपये भांडवलावर काढण्यांत आली. राज्यसरकारचे वरिष्ठ नोकर आपलीं कामें सांभाळून कंपन्यांच्या बोर्डांवर कामें करतात.

---

## जपानी व हिंदी नटनटी असलेला चित्रपट

दक्षिण भारतामधील व जपानमधील नटनटींनीं कामें केलेला एक आंतरराष्ट्रीय चित्रपट काढण्याचें जपानमधील एका फिल्म कंपनीनें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं जपानी फिल्म कंपनीचा प्रतिनिधि नुकताच मद्रासला आला होता. दक्षिण भारतामधील बोलपटनिर्मात्यांशीं बोलणीं करून तो परत गेला. संकल्पित बोलपटांत काम करणाऱ्या तामीळ नटनटींच्या संवादांना जपानी भाषेंतील ध्वनि जोडण्यांत येईल आणि मग तो चित्रपट जपानमध्यें दाखविण्यांत येईल. उलटपक्षी, जपानी नटनटांच्या संवादाला तामीळ भाषेंतील ध्वनि जोडण्यांत येईल. बोलपटांची ही आवृत्ति तामीळनाडमध्यें दाखविण्यांत येईल. त्याशिवाय बोलपटाला इंग्रजी संवाद जोडून तो मोठमोठ्या शहरांतून दाखविण्यांत येण्याची शक्यता आहे. एका जपानी युवकाचें हिंदी तरुणीवरील प्रेम अगर हिंदी तरुणाचें जपानी तरुणीवरील प्रेम, हा चित्रपटाचा विषय असेल. चित्रपटासंबंधींची सर्व तयारी अद्याप झालेली नाहीं. परंतु चालू वर्षअखेर बोलपटाच्या चित्रीकरणाला जपान व भारत ह्या दोन्ही देशांत एकदमच सुरुवात करण्यांत येईल. हा चित्रपट तयार करण्यास २५ लाख रुपये खर्च लागेल असा अंदाज आहे. संबंधित जपानी कंपनीनें अशाच प्रकारचा एक बोलपट अमेरिकन व जपानी नटांच्या सहकार्यानें तयार केलेला आहे. सध्या तो अमेरिकेंत आणि हॉंगकॉंगमध्यें चालू असून अतिशय लोकप्रिय झालेला आहे. भारत व जपान ह्यांच्यांतील सांस्कृतिक संबंध अशा चित्रपटांमुळें अधिक निकटचे होतील असें समजण्यांत येत आहे. तथापि चित्रपटाची व्यावहारिक बाजूहि आकर्षक ठरण्याची शक्यता आहे. हा चित्रपट जपानमध्यें लोकप्रिय ठरल्यास भारताला परदेशीय चलनाची मोठी प्राप्ति होणें शक्य आहे.

---

**भाक्रा धरणावरील वीजनिर्मिति**—भाक्रा धरणावरील विद्युत्पादनाचा तिसरा जनरेटर पुढील महिन्याच्या अखेर चालू करण्यांत येईल. त्यामुळें ९०,००० किलोवॅट अधिक वीज निर्माण होईल. ह्या जनरेटरची चांचणी नुकतीच यशस्वी रीत्या करण्यांत आली.

# पानशेत धरणाची पार्श्वभूमि

[ पानशेत धरणाच्या दुःखदायक घटनेची संपूर्ण चौकशी करण्याचें आश्वासन मुख्य मंत्रि श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनीं दिलें आहे. मुठेचें जास्तींत जास्त पाणी सांठविलें जावें, ह्या दृष्टीनें खडकवासला येथेंच दगडी मोठें धरण बांधावें असा आग्रह डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशननें धरला होता. ह्या उलट, शक्य तितक्या लवकर पाणी-पुरवठा सुरू व्हावा ह्या दृष्टीनें वरच्या बाजूला पानशेतच्या धरणाची योजना सरकारनें संमत केली. तज्ज्ञांच्या सल्ल्याप्रमाणेंच, साधकबाधक विचार करून, सरकारनें अंतिम निर्णय घेतला असला पाहिजे, हें उघड आहे. तूर्त कोणांहि कोणास दोष देऊन कांहींहि साध्य होणार नाहीं; चौकशी पुरी झाल्यावरच नेमकें काय व कुठें चुकलें, तें समजूं शकेल. तज्ज्ञांच्या मतांत प्रामाणिक अंतर पडूं शकतें, हेंहि लक्षांत ठेवायला हवें. पानशेतच्या पार्श्वभूमीकडे ह्या दृष्टीनेंच पाहणें आवश्यक आहे. ]

### अधिकृत माहिती

डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशननें २९ ऑगस्ट, १९५७ रोजीं मुंबई सरकारला एक निवेदन सादर केलें होतें आणि त्याच्या स्पष्टीकरणासाठी मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण व पब्लिक वर्क्स खात्याचे मंत्री श्री. डी. एस्. देसाई ह्यांची मुलाखत मागितली होती. सरकारकडून उत्तर मिळाल्यावर प्रो. ध. रा. गाडगीळ (अध्यक्ष), श्री. डी. एल्. साठे, सेवानिवृत्त चीफ कॉन्झर्वेटर ऑफ फॉरेस्ट्स् (चेअरमन), श्री. आर. जी. सुळे व श्री. सी. जी. काळे (सेवानिवृत्त चीफ इंजिनिअर्स), श्री. बी. आर. सरदेसाई (सेवानिवृत्त एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअर) आणि डॉ. आर. जी. काकडे (सेक्रेटरी) ह्यांनीं असोसिएशनच्या वतीनें उभयता मंत्र्यांची सचिवालयांत दि. १० ऑक्टोबर १९५७ रोजीं दुपारीं ३ वाजतां भेट घेतली. त्यावेळीं श्री. एस्. जी. बर्वे (सेक्रेटरी टू गव्हर्मेंट, पब्लिक वर्क्स खातें) आणि श्री. जी. एन्. महिद्रा (इरिगेशनचे चीफ इंजिनिअर) हेहि उपस्थित होते व त्यांनींहि चर्चेत भाग घेतला. उपस्थित करण्यांत आलेल्या कांहीं तांत्रिक मुद्यांवर चर्चा झाली, त्याला सेक्रेटरी व चीफ इंजिनिअर ह्यांनीं उत्तरें दिलीं. अखेर प्रो. गाडगिळांनीं मुख्य मंत्र्यांचे आभार मानून, सरकारचीं उत्तरें व खुलासे ह्यांचें टिपण पुरविण्यांत यावें, म्हणजे निवेदन आणि सरकारचें टिपण एकदमच जनतेच्या माहितीसाठी देतां येईल, अशी विनंती केली. सरकारनें त्याप्रमाणें निवेदनाचा गोषवारा आणि त्याला उत्तरें व खुलासे एकत्रित स्वरूपांत प्रेसनोटद्वारां प्रसिद्ध केलें. त्यावरून असोसिएशननें तयार केलेल्या अहवालांतून पानशेत-विषयक मजकूर येथें उद्धृत केला आहे.

"महाराष्ट्रांतील अन्नपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी धरणें बांधण्याची आवश्यकता असोसिएशननें १९४७ सालींच सरकार-कडे निवेदन पाठवून स्पष्ट केली होती. त्यावेळेच्या मुख्य मंत्र्यांना असोसिएशनच्या कमिटीनें प्रो. गाडगीळ ह्यांच्या नेतृत्वाखाली भेटून ह्या निवेदनाचें स्पष्टीकरण केलें होतें. १९५१ मध्यें असो-सिएशननें मुंबई सरकारला पुनः निवेदन पाठवून पश्चिम महाराष्ट्रांत पांच मोठ्या योजनांची मागणी केली होती. ह्या सर्व योजना १९४४ व १९४७ च्या पोस्ट वॉर रीकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट स्कीममध्यें समाविष्ट केल्या गेल्या, तरी १९५१ मध्यें प्रसिद्ध झालेल्या योजनेच्या मसुद्यांत त्यांचा अंतर्भाव नव्हता. प्लॅनिंग कमिशनला असोसिएशननें १९५२ मध्यें सादर केलेल्या निवेदनांत, पहिल्या पंचवार्षिक योजनेंत वीर धरण, खडकवासला धरण, कुकडी खोरें योजना, मुळशी खोरें योजना, गिरणा खोरें योजना, ह्या पांच पाणीपुरवठ्याच्या योजनांचा व कोयना वीज पुरवठा योजनेचा समावेश करण्याचा आग्रह धरण्यांत आला होता. पण ह्या पांचहि पाणीपुरवठ्याच्या योजनांचा अंतर्भाव करण्यांत आला नाहीं; दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत मात्र फक्त चारांचा समावेश करण्यांत आला. धरणांच्या नकाशांत एकसारखे फेरफार आणि तांत्रिक तपशिलाची अनिश्चितता महाराष्ट्राच्या वांट्यास आली; त्यामुळें दिरंगाई होत चालली. असोसिएशनचें म्हणणें असें, कीं तात्कालिक लहानशा काटकसरीच्या कारणावर आवश्यक त्या धरण-योजनांची रचना व जागा अवलंबून ठेवण्यांत येऊं नये; कारण त्याचे परिणाम दूरगामी व चिरकाल असतात आणि रचना व जागा पुढें बदलता येत नाहीं.

"दगडाचें धरण बांधावें कीं मातीचें, ह्या चर्चेमुळें विलंब होत आहे, असें दिसतें. पाणी सांठवण्यासाठी सुधारलेल्या पद्धतीचीं व बांधणीचीं धरणें उभारणें दगडी धरणांपेक्षा कांहींशी स्वस्त पडतात म्हणून नव्या धरणांच्या उभारणीसाठी मातकामाची शिफारस करण्याची प्रवृत्ति आढळते. हें म्हणणें खरें मानलें, तरी सुद्धां दुरुस्तनचा भाग दगडाच्या धरणांस विशेष सोईचा आहे, असें सरकारला दाखवून देणें असोसिएशनला अगत्याचें वाटतें. दगडाच्या उंच धरणांचा कित्येक वर्षांचा अनुभव अनुकूल आहे; पण आपला मातीच्या धरणांचा अनुभव मर्यादित आहे. मातीच्या धरणाकडे त्याच्या उभारणीचे काळांत दैनंदिन काळजीपूर्वक लक्ष द्यावें लागतें. धरणाला योग्य अशी माती पुरेशा प्रमाणांत उपलब्ध होईलच असें नाहीं. अशा धरणाला महाग यंत्रसामग्री लागते, तिच्यासाठी दुर्मीळ परदेशी हुंडणावळ खर्चावी लागेल. सध्यांचा मशिनरीचा सेट एकामागून एक धरणाला वापरावयाचा म्हटला, तर मातीचीं सर्व धरणें पुरीं करायला तीन पंचवार्षिक योजनाहि पुऱ्या पडणार नाहींत. ह्या उलट, दगडी धरणांची प्रगति हळूहळू होत गेली, तरी तीं त्याच्या आधीं तयार होतील. ह्यासाठी, ज्या विभागांत पुरेसा चांगला दगड उपलब्ध नाहीं, तेथेंच मातीचीं धरणें उभारणें उचित ठरेल." असें निवेदनांत म्हटलें आहे.

सरकारतर्फे असें सांगण्यांत आलें कीं, कोणत्या प्रकारचें धरण बांधावयाचें, तें तांत्रिक व आर्थिक दृष्टिकोणांतून, तुलनात्मक अभ्यास करून, ठरवावें लागेल. प्रत्येक धरणाचा विचार स्वतंत्रपणें करावा लागेल. मोठालीं मातीचीं धरणें उभारण्यास तांत्रिक दृष्टीनें लायक असे कित्येक इंजिनिअर्स मुंबई सरकारच्या पब्लिक वर्क्स खात्यांत आहेत. प्रत्येक धरणाची आखणी प्रत्येक बाबीची शहानिशा करूनच ठरविण्यांत येत आहे.

"खडकवासला धरणाची योजना पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करायला हवी होती, पण त्या बाबतींत उत्साहानें प्रारंभ केलेला दिसत नाहीं; धरणाच्या दगडी बांधणीची मूळ योजना कायम ठेवली असती तर पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभींच कामाला सुरु-वातहि झाली असती. पण, खडकवासल्याला मोठें धरण बांधण्या-ऐवजीं वरच्या बाजूला दोन मातीचीं धरणें बांधण्यांत येणार आहेत असें समजतें; पानशेतच्या धरणाची पूर्वतयारीहि चालू आहे." असोसिएशनच्या ह्या म्हणण्याला सरकारनें उत्तर दिलें, कीं

दिरंगाईची भीति अनाठायी आहे; दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर पाणीपुरवठ्याचा प्रत्यक्ष फायदाहि पदरांत पडूं लागेल.

"पावसाळी परिस्थितीच्या विभागांत (१०० इंचांपेक्षा जास्त) वरच्या दोन धरणांसाठी मातीचा उपयोग केला तर तीं धरणें सुरक्षित राहतील का, अशी शंका कांहीं क्षेत्रांतून व्यक्त करण्यांत आली आहे. मुठेतून वाहणारें सर्व उपलब्ध पाणी अडविणें आवश्यक आहे; नियोजित दोन धरणें फक्त १२०० कोटी घनफूट पाणी सामावूं शकतील," ह्याला सरकारनें उत्तर दिलें, "दोन मातीचीं धरणें बांधल्यानें एकूण १ कोटी रुपयांची बचत होणार आहे. हीं धरणें बांधल्यानें पाणी लवकर मिळूं शकेल आणि मुठेवर आणखी धरण बांधण्याला पुन: वाव राहीलच. खडकवासला येथें धरण उभारावयाची योजना, नवें धरण सध्यांच्या धरणापेक्षा उंच बांधून झाल्यानंतरच, फायदा देऊं लागली असती. ही उंची साध्य होण्यापूर्वी कितीतरी मोठें बांधकाम पुरें करावें लागलें असतें."

## पौंडी गंगाजळींत झालेली घट

गेल्या कांहीं महिन्यांत भारताची पौंडी गंगाजळी बरीच घटल्यामुळें चिंतेचें वातावरण निर्माण झालें होतें. परंतु सरकारी गोटांतील मताप्रमाणें परिस्थिति फारशी चिंता करण्यासारखी नाहीं. गंगाजळींत घट होऊन ती आतां ११४ कोटी रुपयांपर्यंत घसरली आहे ही गोष्ट खरी आहे. आतांपर्यंत गंगाजळीची पातळी इतकी खालीं कधींहि गेलेली नव्हती. भारताची निर्यात हळूहळू वाढत आहे आणि परदेशाकडून मिळालेली मदत लवकरच प्रत्यक्ष हातीं येऊं लागेल. गेल्या २० जून पर्यंत भारताची निर्यात ३१३ कोटी-पर्यंत झाली होती. ही निर्यात ५ महिने व २० दिवसांतील आहे. गेल्या वर्षी ह्याच कालांत झालेल्या निर्यातीपेक्षा ही निर्यात ३० कोटी रुपयांनीं अधिक आहे. पश्चिम जर्मनीकडून मिळणारी बहुतेक मदत भारताला पाहिजे तो माल विकत घेण्यासाठी वापरतां येईल. रुरकेला येथील कारखान्यासाठी लागणारा माल एवढाच काय तो अपवाद आहे. ह्या कारखान्याच्या विस्तारासाठी लागणारी मदत सोडली तर बाकीची जर्मन मदत कोणत्याहि विशिष्ट कामासाठी राखून ठेवण्यांत आलेली अशी नाहीं. अमेरिकेकडून येणारी मदत ऑक्टोबरमध्यें येईल असा अंदाज आहे. ह्या मदतीपैकी कांहीं पैसाहि भारत आपल्या मताप्रमाणें वापरूं शकेल. परदेशीय चलनाच्या खर्चाबाबत विशेष काळजी घेण्यास पाहिजे. विशेषत: परदेशांना देण्यांत येणाऱ्या भेटींवर कडक नियंत्रण ठेवावयास पाहिजे. हें खरें असलें तरीसुद्धां भारताला आणखी ३० कोटी रुपयांचे पौंड कायद्याचा भंग न करतां वापरतां येतील. सध्यांच्या कायद्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेजवळ २०० कोटींचें परदेशीय चलन असावें लागतें. त्यांपैकी ११५ कोटींचें परदेशी चलन सोन्याच्या व बाकीचें परदेशीय रोख्यांच्या स्वरूपांत असावें लागतें. रिझर्व्ह बँकेचा हा निधि सध्यां ११७ कोटी रुपयांचा आहे.

## "अर्था"चा अंक

"अर्थ" छापण्यांत येतो, त्या आर्यभूषण मुद्रणालयाच्या आवारांत व कचेरींत पाणी शिरलें; ह्या पलीकडे तें गेलें नाहीं. तथापि, कित्येक कामगारांचीं नदीकांठचीं घरें वाहून गेलीं असून त्याचा कामावर परिणाम झाला आहे. अशाहि परिस्थितींत "अर्थ" निघूं शकला, ह्याबद्दल मुद्रणालयाचे आम्ही आभारी आहों. —संपादक

## महाराष्ट्र बँकेच्या डे. जिमखाना शाखेनें पुरास तोंड कसें दिलें?

महाराष्ट्र बँक लि. च्या डेक्कन जिमखाना शाखेच्या इमारतींत सुमारें १०–३० वाजतां म्हणजे व्यवहाराची वेळ संपल्यानंतर पाणी शिरलें. शाखेचे एजंट श्री. केसकर ह्यांनीं ताबडतोब सर्व कॅश एकत्र करून, गिऱ्हाइकांचे रोखे, शेअर्स, सर्टिफिकेट्स, तळघरांतील तिजोरींतून वर आणले. रिझर्व्ह कॅशहि वर आणली. त्यावेळीं तळघरांत ५ फुटांइतकें पाणी झालें होतें. चालू लेजर्स शक्य तितक्या उंचीवर ठेवण्याचा प्रयत्न केला. तोंपर्यंत पहिल्या मजल्यावर चार फुटांवर पाणी चढलें होतें. त्यानंतर मात्र अधिक धोका न पत्करतां सर्व दारें-खिडक्या बंद करून सर्व लोक बाहेर पडले. तोंपर्यंत ११–४० वाजले होते. कित्येक लक्ष रुपयांची कॅश युनिव्हर्सिटी शाखेंत सुरक्षित नेऊन ठेवण्यांत आली. संध्याकाळीं पाणी उतरल्यानंतर शाखेच्या इमारतीकडे एजंटांनीं सर्व पहाणी केली त्यावरून दिसून आलें कीं, शाखेच्या इमारतीवरून चार फूट पाणी गेलें असावें. त्यानंतर पुरामुळें जे दरवाजे उघडले गेले होते ते बंद करून घेण्यांत आले.

दुसरे दिवशीं म्हणजे गुरुवारीं सकाळीं ७ वाजतां साफ सुफीस प्रारंभ करण्यांत आला. त्यावेळीं असें दिसून आलें कीं, गोदरेजचीं जड कपाटें सुद्धां पाण्याच्या वेगानें कोलमडून खालीं पडलीं होतीं. सर्व फर्निचर उद्ध्वस्त झालें होतें. सुरक्षित वाटलेल्या ठिकाणीं ठेवलेल्या हिशेबाच्या वह्या तेथून वाहून इतस्तत: चिखलांत पसरल्या होत्या. सांपडली गेलीं तेवढीं चालू लेजर्स काढून ड्राइंग मशीनमध्यें वाळवण्याकरितां किर्लोस्कर ऑइल इंजिन्सकडे पाठविण्यांत आलीं. त्यानंतर व्हॉल्टमधील पाणी पंपाच्या साह्यानें उपसण्यांत आलें व तें पाणी कमी झाल्यानंतर वृत्तपत्रांतून परिस्थितीचें निवेदन करण्यांत आलें. लॉकर्समध्यें पाणी शिरलें तरीसुद्धां आंतील कागदपत्र ओले होण्यापलीकडे हानि झाली नाहीं आणि कोणत्याहि लॉकर-होल्डराची तक्रार आलेली नाहीं. ह्या बाबतींत शाखाधिकाऱ्यांना खातेदारांकडून जी सहानुभूति व साहाय्य मिळालें, त्याबद्दल कितीहि कृतज्ञता व्यक्त केली, तरी ती अपुरीच पडेल. अडचणींत असलेल्या खातेदारांना तातडीनें त्यांच्या खात्यांतून पैसे देण्याची व्यवस्था मुख्य कचेरीमार्फत करण्यांत आली आहे. सर्व व्यवहार नेहमीसारखे सुरू होण्यास १५ दिवस तरी लागतील असें वाटतें.

शाखेंतील सर्व अधिकाऱ्यांनीं, नोकरांनीं, जिवाची पर्वा न करतां स्वत:च्या घरादाराची तमा न बाळगतां, बँक-शाखेला वांचविण्यासाठी अत्यंत निष्ठेनें कामगिरी बजावली, त्यामुळेंच खातेदारांच्या हिताचें संरक्षण होऊं शकलें. संस्थेवरील त्यांच्या प्रेमाच्या दिव्य कसोटींस ते पूर्णपणें उतरले, ह्यांत शंका नाहीं. ह्या शाखेंत मुख्य कचेरीच्या खालोखाल ठेवींची रक्कम आहे, ह्यावरून तिचा व्याप आणि तिचा झालेला बचाव, ह्याचें महत्त्व लक्षांत येईल. चालू लेजर्स कल्पनेपेक्षा खूपच सुस्थितींत असल्यामुळें व्यवहार सुरळीत होण्याला विलंब लागला तरी अडचण होणार नाहीं. शाखेंत काम करणाऱ्या बहुतेक प्रत्येकालाच हातापायाला जखम होऊन त्यावर वैद्यकीय उपचार करावे लागले आहेत.

**इराणला चहाची निर्यात**—इराण व भारत ह्यांच्यांत नुकत्याच झालेल्या व्यापारी करारामुळें चालू वर्षी भारत इराणला निदान १·५ कोटी पौंड चहा निर्यात करील. त्याशिवाय साखर, साखरेच्या कारखान्यांची यंत्रसामग्री, सिमेंट, पोलाद, रासायनिक माल इत्यादि पदार्थांचीहि निर्यात इराणला करण्यांत यावयाची आहे.

**विद्यापीठाला देणगी**—राष्ट्रपति राजेंद्र प्रसाद ह्यांनी आपलें सर्व वाचनालय बिहार विद्यापीठाला देणगी म्हणून देण्याचें ठरविलें आहे. त्यांच्या वाचनालयांत सुमारें १२,००० ग्रंथ आहेत. बिहार प्रदेश काँग्रेस कमिटीनें चालविलेली ही एक राष्ट्रीय शिक्षणसंस्था आहे. विद्यापीठाच्या इमारतींत असलेला प्रशस्त दिवाणखाना वाचनालयासाठी वापरण्यांत येणार आहे. दिवाणखान्यांत जरूर त्या सुधारणा करवून घेण्यांत येतील.

**झेकोस्लोव्हाकिआकडून मदत**--दिल्लीमधील झेकोस्लोव्हाकिअन वकिलातीच्या आर्थिक सल्लागारानें असें प्रकट केलें आहे कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला मदत म्हणून झेक सरकार भारताला ४० कोटी रुपयांचें कर्ज देणार आहे. ह्या मदतीचा उपयोग ४ मोठे कारखाने उभारण्यासाठी करण्यांत यावयाचा आहे. दक्षिण भारतांत उभारण्यांत यावयाचा विजेच्या अवजड यंत्रसामग्रीचा कारखाना त्यांतील एक आहे.

**प्रेमवीरांना पकडण्यासाठी खास पोलिसदल**—नागपूरमधील शाळा व कॉलेजें सुरू झाल्यापासून शाळेंत अगर कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थिनींशीं लघळपणा करणाऱ्या प्रेमवीरांची संख्याहि फुगली आहे. गेल्या कांहीं दिवसांत पोलिसांनीं २५० प्रेमवीरांना पकडून त्यांच्यावर खटले भरले आहेत. प्रेमवीरांना अटक करण्यासाठी खास पोलिसपथक व साध्या पोषाखांतील पोलिस ह्यांची योजना करण्यांत आली आहे.

**अमेरिकेकडून रणगाडे मागविले नाहींत**—पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल अयूबखान ह्यांनीं एका ब्रिटिश वार्ताहराला दिलेल्या मुलाखतींत भारतानें अमेरिकेकडून ३०० रणगाडे घेण्याचें ठरविल्याचें सांगितलें होतें. ह्या वृत्ताचा भारतातर्फे इन्कार करण्यांत आला आहे. भारत स्वतःला लागणारी सर्व संरक्षणविषयक सामग्री स्वतःच करण्याच्या अवस्थेंत आहे असेंहि सांगण्यांत आलें.

**केरळमधील सहकारी साखर कारखाना**--केरळ राज्यांत पंढलम् ह्या ठिकाणीं साखरेचा सहकारी कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याच्या भागभांडवलांत सहभागी होण्यासाठी राज्यसरकारनें १० लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. त्याशिवाय कारखान्याला यंत्रसामग्री पुरविणाऱ्या कंपनीला बँकेतर्फे १५ लाख रुपयांची हमी देण्याचेंहि सरकारनें ठरविलें आहे.

**हातमाग-विणकरांसाठी घरें**—सांगलीपासून २२ मैलांवर कुंडल ह्या गांवीं हातमाग-विणकरांसाठी एक वसाहत स्थापण्यास मध्यवर्ती सरकारच्या व्यापार खात्यानें मंजुरी दिली आहे. वसाहतींत बांधण्यांत यावयाच्या प्रत्येक घरामागें ३,६०० रुपयांपेक्षा अधिक खर्च येणार नाहीं. येणाऱ्या खर्चापैकीं दोनतृतीआंश खर्च कर्ज म्हणून मिळणार असून बाकीचा देणगी म्हणून मिळणार आहे.

**रशिआचें हवाई सामर्थ्य**—रशिआनें मॉस्कोजवळील विमानतळावर आपल्या हवाई सामर्थ्याचें प्रदर्शन केलें. आवाजापेक्षाहि अधिक वेगानें जाणारीं व अग्निबाण सोडूं शकणारीं जेटचीं विमानें ह्या प्रदर्शनांत होतीं. १९५६ सालीं रशिआनें विमानांची कवाईत केली होती. त्या वेळेपेक्षा ह्या वेळीं १० नव्या धर्तीचीं विमानें पाहण्यांत आलीं.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग्ज | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८ ] गिरगांव, मुंबई ४. [ टेलि. : ७००१४

**महाराष्ट्राची अग्रेसर सहकारी बँक**

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ... | ... | रु. ८,७५,००० |
| रिझर्व्ह फंडस् : | ... | ... | रु. १०,०८,००० |
| ठेवी : | ... | ... | रु. १,४५,५७,००० |
| खेळतें भांडवल : | ... | ... | रु. १,७६,००,००० |

*शाखा : फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहीम, पुणें, बेळगांव.*

*मुख्य शाखा :* **सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.**

## लोकसंख्या आणि धान्योत्पादन ह्यांतील रस्सीखेंच

जगांतील लोकसंख्येच्या प्रश्नाचा अभ्यास करणारी पॉप्युलेशन रेफरन्स ब्यूरो ह्या नांवाची एक संस्था अमेरिकेंत आहे. सदर संस्थेनें भारत व पाकिस्तान ह्या देशामधील लोकसंख्येच्या प्रश्नाविषयीं कांहीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. संस्थेतर्फे प्रसिद्ध करण्यांत आलेल्या माहितींत असें म्हटलें आहे कीं, १९६१ च्या शिरगणतींत भारताची व पाकिस्तानची लोकसंख्या अपेक्षेपेक्षा फार मोठ्या प्रमाणांत वाढली. १९५१ च्या शिरगणतीच्या आधारानें १९६० पर्यंत होणाऱ्या लोकसंख्येच्या वाढीचा अंदाज करण्यांत आला होता. पण हा अंदाज भारताच्या बाबतींत ७० लाखांनीं चुकला आणि पाकिस्तानच्या बाबतींत ४० लाखांनीं चुकला. हे दोन्ही देश अतिशय दाट लोकवस्तींचे असून तेथील सरकारें लोकांच्या राहणीचें मान वाढविण्याचे जोराचे प्रयत्न करीत आहेत. परंतु लोकसंख्येची वाढ अपेक्षेपेक्षा फारच जोरानें होत आहे. ही परिस्थिति अतिशय धोक्याची आहे. भारतापेक्षा फक्त चीनची लोकसंख्या अधिक आहे. भारताची लोकसंख्या ४३·८ कोटी आहे व चीनची ७० कोटी आहे. पण चीनला भारताच्या तिप्पट भूभागाचा लाभ झालेला आहे. भारताच्या खालोखाल पाकिस्तान, जपान व इंडोनेशिया ह्यांची लोकसंख्या आहे. वरील प्रत्येक देशाची लोकसंख्या ९·४ कोटींच्या आसपास असून लोकसंख्येच्या बाबतींत त्यांचा क्रमांक ५ वा लागतो. भारत व पाकिस्तान ह्या देशांतील लोकसंख्या ह्याच वेगानें वाढत चालली तर दोन्ही देशांतील विकासाच्या कार्यक्रमावर अतिशय विपरीत परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं भारताची लोकसंख्या सध्यांच्याच गतीनें वाढत राहिली तर ती पुढच्या १० वर्षांच्या कालांत ४३·८ कोटींपासून ५३ कोटींपर्यंत अगर थोडी अधिकहि वाढेल, व ३२ वर्षांच्या कालांत ८७·३ कोटींच्या घरांत जाईल. पाकिस्तानची लोकसंख्या येत्या १० वर्षांत ९·४ कोटींपासून ११·५ कोटींपर्यंत जाईल आणि २८ वर्षांच्या कालांत १८·८ कोटींच्या घरांत जाईल.

भारत आणि पाकिस्तान ह्यांच्या ताज्या शिरगणतीचे आंकडे जेव्हां बाहेर पडले त्या वेळीं जगाच्या लोकसंख्येंत एकदम १·१ कोटींची भर पडली. १९५३ सालीं चीनची लोकसंख्या मानण्यांत येत होती त्यापेक्षा १० कोटींनीं अधिक असल्याचें आढळून आलें. तेव्हांहि जगाच्या लोकसंख्येंत अशीच एकदम भर पडली. भारत, पाकिस्तान व इतर अविकसित देश ह्यांच्यांत धनोत्पादन आणि प्रजोत्पादन ह्यांमध्यें एकसारखी शर्यत लागलेली आहे. ह्या शर्यतीच्या निकालावर अविकसित देशांच्या भवितव्यतेचें चित्र अवलंबून आहे. लोकसंख्येची भरमसाठ वाढ मानवी प्रगतीच्या वाटेंतील कायमची धोंड होऊन राहण्यास आतां फारसा अवधि उरलेला नाहीं. भारत व पाकिस्तान ह्या देशांतील लोकसंख्या अशीच वाढत राहिली तर आर्थिक विकासाची गति कायमची खुंटल्याशिवाय राहणार नाहीं· दोन्ही देशांत अलीकडे कुटुंबनियोजनाचे कार्यक्रम हातीं घेण्यांत आलेले आहेत. पण ह्या कार्यक्रमांचा जननाच्या प्रमाणावर म्हणण्यासारखा परिणाम अद्याप झालेला नाहीं. गरजेच्या मानानें हे कार्यक्रम फारच अपुरे आहेत. ह्या कार्यक्रमांची व्याप्ति आणि तीव्रता ह्या दोन्हींतहि वाढ होणें अतिशय अगत्याचें आहे. जननाचें प्रमाण कमी करण्याचीं नवीं व कार्यक्षम साधनें शोधून काढण्यांत आलीं पाहिजेत आणि भारत व पाकिस्तानपर्यंत पोंचविण्यांत आलीं पाहिजेत.


स्थापना १९१६

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगाव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नासिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. हलकर्णी, ११. इचलकरंजी, १२. फलटण, १३. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९६० |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ५,०५,००० |
| ठेवी | रु. | २,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,५९,००,००० |

ठेवीवरील नवीन व आकर्षक व्याजाचे दर

१. चालू खातें ०–५० २. सेव्हिंग्ज बँक २–५०

३. स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट ३–००

मुदत ठेवी—१ वर्ष ३–०० २ वर्षें ३–२५

३ वर्षें ३–७५ ५ वर्षें ४–००

रुपये एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.



**दि मिरज स्टेट बँक, लि.**

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९२१

वसूल शेअर भांडवल : रुपये सहा लाख

खेळतें भांडवल : रुपये एक कोट

रिझर्व्ह फंड व इतर फंड : रुपये सात लाख

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुदत ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर

१ वर्ष ३¾% ३ वर्षें ४¼%

२ वर्षें ४% ४ वर्षें ५%

५ वर्षें ५%

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखा: सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, ॲड्व्होकेट, चेअरमन.

के. डी. शिराळकर, मॅनेजर.

# Co-operative Training College, Poona.

**5, B. J. Road, P. B. No. 32, Poona 1.**

**Results of the Examination for Higher Diploma in Co-operation held in April 1961.**

**First Class**

M. K. Joglekar, R. A. Dixit, M. P. Mahajan, P. D. Bais, S. R. Jog, K. T. Vaidy, Kumari M. D. Parulekar, B. N. Mujawar.

**Second Class**

C. J. Upadhye, P. I. Desai, R. H. Morabia, R. S. Kallole, V. S. Khanwelkar, B. S. Patel, D. D. Rajeshirke, P. S. Gor, M. T. Desai, D. C. Desai, N. H. Deshpande, M. C. Thakkar, J. M. Jagdale, N. P. Barbde, W. B. Gramastha, S. E. Palve, J. M. Karne, S. J. Paithankar, P. N. Kolte, V. P. Raje, L. K. Chitale, D. P. Aphale, K. D. Joshi, M. D. Pande, I. M. Purohit, V. G. Bhate, S. B. Madiwale, S. T. Rana, N. M. Dixit, J. R. Rawal, Y. S. Kale, N. P. Gaoli, K. R. Mahalle, V. M. Pathak, V. N. Golawar, K. Rehman, S. G. Pawar, V. S. Nemiwant. C. M. Tailor.

**Pass Class**

V. N. Wadodkar, D. V. Chore, M. N. Pandhare, P. C. Desai, M. M. Bhatt, J. R. More, T. D. Chore, V. L. Kathane, V. N. Deshpande, V. B. Behare, G. D. Channe, D. L. Parsodkar, A. P. Dharwadkar, B. N. Mankad, H. T. Anjankar.

**Pass with Exemption**

A. V. Mangalwedhekar,

(With exemption in Book-keeping, Accountancy and Advanced Accountancy)

M. W. Kirtane (Repeater)

(With exemption in Business Management, Book-keeping and Accountancy and Co-operative and Other Laws).

**Prizes have been awarded as under**

| S. N. | Name of Donor | Amout of Prize Rs. | To whom awarded |
|---|---|---|---|
| 1 | Maharashtra State Co-operative Bank Ltd., Bombay. | 100/- | Shri M. K. Joglekar Highest number of marks—421 out of 650. |
| 2 | Bombay State Industrial Co-operative Association. | 50/- | Kumari M. D. Parulekar Highest number of marks in Optional subject of Industrial Co-operation 74 out of 100. |

**P. M. Chengappa**
Principal

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.


## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

स्थापना : १९११

टेलिफोन, नं. २५५४७४-७५ — पोस्ट बॉक्स नं. ७७२ तारेचा पत्ता—कार्मरबँक

मुख्य कचेरी— ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

चेअरमन : श्री. प्रा. घ. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | १ कोटी, ४५ लक्ष |
| गंगाजळी व फंड | रु. | ७२ ,, |
| ठेवी | रु. | १४ कोटी, १६ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. | २७ कोटी |

महाराष्ट्र राज्यांतील, शाखा व संलग्न बँका ३०४

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठी चौकशी करावी.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.



टेलिफोन नं. २४८३. तार :

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

इकडे वेळींच लक्ष द्या.... ... ....

आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | व्याजाचे नवीन दर |
|---|---|
| १ वर्ष ... ... | ४ टक्के |
| २ वर्षें ... ... | ४। टक्के |
| ३ वर्षें ... ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव ... ... | २॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

बा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.